माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.१०२३६/२१/अ.क्र.४७८७/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.१०२३७/२१/अ.क्र.४७८८/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.१०२३५/२१/अ.क्र.४७८९/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.१०२३३/२१/अ.क्र.४७९०/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.१०२३२/२१/अ.क्र.४७९१/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.१०२३४/२१/अ.क्र.४७९२/२५/०१**

**श्री. दिपक खामकर**
प्लॉट क्र. २०२/क १, सागर सह. गृह. संस्था,
सेक्टर क्र. २, चारकोप,
कांदिवली (प.), मुंबई-६७

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि) एच/पश्चिम विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिक सहाय्यक आयुक्त एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,
२ री हसनाबाद लेन, खार (पश्चिम), मुंबई – ४०००५२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एच पश्चिम विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिक सहाय्यक आयुक्त एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,
२ री हसनाबाद लेन, खार (पश्चिम), मुंबई – ४०००५२.

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १२.०९.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित (ऑनलाईन) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर द्वितीय अपिलावर आज दि.१२.०९.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी दृकश्राव्य माध्यमाद्वारे उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि) एच/पश्चिम विभाग व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एच पश्चिम विभाग अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असे विशद केले की, "एच/पश्चिम विभाग हद्दीतील विविध रस्त्याठिकाणी खड्डे बुजाविण्या (Pot holes Reparing)" कामाबद्दलची माहिती प्राप्त झाली नाही.

या अपिला संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी श्री. दिपक खामकर यांनी दाखल केलेल्या प्रस्तुत प्रकरणात जोडपत्र-अ च्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता एच/पश्चिम विभाग यांनी उपलब्ध असलेली माहिती, त्यांचे पृष्ठांची संख्या व त्यासाठी लागणारे शुल्क याबाबतीत सुस्पष्ट प्रतिसाद दिला असल्याचे आढळून येते.

अपिलार्थी श्री. खामकर यांनी आक्षेप नोंदणीत मुद्देनिहाय पृष्ठसंख्या कळविणे बंधनकारक असताना दिलेला प्रतिसाद तसेच आकारण्यात आलेली रक्कम अवाजवी असल्याचे नमूद केले. ही माहिती इलेक्ट्रॉनिक स्वरूपात हवी असल्याचेही यात नमूद केलेले आहे. यावर झालेल्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीस तत्कालीन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एच/पश्चिम विभाग यांनी अपीलकर्ता यांना अपेक्षित असणारी माहितीचे निरीक्षण देऊन सदर माहिती इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध असल्यास ती त्यांच्या ई-मेलवर द्यावी व सुधारित उत्तर देऊन कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती विहित शुल्क भरून द्यावी असे नमूद केले. अपिलार्थी यांनी मुद्देनिहाय माहिती प्राप्त झाली नसल्याचा तसेच वारंवार पाठपुरावा केला असताना तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एच/पश्चिम विभाग यांच्या आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचे नोंदविले आहे. आज झालेल्या सुनावणीस ऑनलाइन पद्धतीने सामील होत अपिलार्थींनी याबाबतीत पुनरोच्चार केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी दाखल केलेला अर्ज यात विचारलेली माहिती व त्याचा कालावधी लक्षात घेता यातील तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एच/पश्चिम विभाग यांनी इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध असलेली माहिती विनामूल्य देण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणे अपिलार्थी यांना वरील सर्व अपील अर्जात जोडपत्र-अ मधील नमूद केलेली कार्यालयीन अभिलेखात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम २(च) प्रमाणे सॉफ्टकॉपी स्वरूपात असलेली माहितीही विनामूल्य त्यांच्या ई-मेलवर प्रदान करावी व उर्वरित माहिती ही जर इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध असल्यास विनामूल्य द्यावी. अन्यथा अपिलार्थी यांना उपरोक्त आदेश प्राप्त झाल्यानंतर २ आठवड्याच्या आत निश्चित वेळ ठरवून अपिलार्थी हे दिव्यांग व्यक्ती असल्याचे वस्तुस्थिती लक्षात घेऊन उर्वरित माहितीचे अवलोकन देऊन अपेक्षित असणारी माहिती अवलोकनानंतर प्रत्येक अपील अर्जात ५० पृष्ठांपर्यंतची माहिती विनामूल्य द्यावी. त्यानंतरची माहिती सशुल्क द्यावी, यातील जी माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ४(१)(ख) नुसार याआधीच सार्वजनिक संकेतस्थळावर उपलब्ध असल्यास त्याचा तपशील अपिलार्थी यांना कळवावा. तसेच अपिलार्थी यांना उघड केलेली मा.सर्वोच्च न्यायालय Kisan Chand Jain Vs. Union of India मुळ याचिका (सिव्हील) क्र. ९९०/२०२१, या प्रकरणात दि. १७ ऑगस्ट, २०२३ यात दिलेल्या निर्देशाप्रमाणे अधिकांश माहिती सर्वसार्वजनिक प्राधिकरणांनी कलम ४(१)(ख) नुसार स्वयंप्ररणेने उघड करणे आवश्यक असून अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती कलम ४(१)(ख) अन्वये स्वत:हून उघड करणाऱ्या माहितीचा भाग असल्याचे प्रथम दर्शनी आढळून येते. तसेच आयोगाच्या दि. २९.०४.२०२५ रोजीच्या कलम १९(८) व २५(५) च्या जारी केलेल्या निर्देशाप्रमाणे अपिलार्थींना प्रदान केलेली माहिती स्वत:च्याही संकेतस्थळावर विनामूल्य उपलब्ध करून द्यावी.

**आदेश**

**१.वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२.वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.**

State Information Commission Maharashtra

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १२.०९.२०२५**

१२.०९.२०२५